# संस्कृती टिकण्यासाठी भाषा जीवंत रहायला हवी

## सुलक्षणा सावंत | आयएमबीतर्फे बहुभाषिक महिला साहित्य मेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८ :** भाषेबरोबर संस्कृती येते म्हणून संस्कृती टिकण्यासाठी भाषा जीवंत रहायला हवी आणि ही भाषा आतली ती बाहेरची असा भेदभाव न करता प्रत्येक भाषेला महत्व दिले पाहिजे. भाषावाद मिटवण्यासाठी अशा प्रकारचे बहुभाषिक साहित्य मेळावे घडवून आणायला हवेत, असे मत समाज कार्यकर्त्या सुलक्षणा सावंत यांनी येथे शनिवारी व्यक्त केले. इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा (आयएमबी) तर्फे आयोजित केलेल्या बहुभाषिक महिला साहित्य मेळाव्यात प्रमुख पाहुण्या म्हणून सुलक्षणा सावंत बोलत होत्या. त्यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून मेळाव्याचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच आयएमबी च्या सहामाही गोवा पुरी या बहुभाषिक नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सन्माननीय पाहुण्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कलाकार आश्विनी जांबावलिकर , गोवा पुरी च्या संपादक तथा व्यासंगी लेखिका डॉ. जयंती नाईक, आयएमबी चे अध्यक्ष दशरथ परब, सदस्य सचिव अशोक परब उपस्थित होते. सुलक्षणा सावंत म्हणाल्या, समाजात बदल घडवण्याची, क्रांती घडवण्याची क्षमता महिलांमध्ये आहे. महिला लेखिकांचे अनुभव हे वेगळे असतात महिलानी ते वाचायला हवेत. डॉ. जयंती नाईक यांनी सांगितले, की महिला नाट्यलेखनात मागे का हा प्रश्न पडतो. सुरवातीच्या काळात पुरुषच नाटके करायचे, स्त्री भूमिकाही तेच वठवायचे. महिलांना स्वातंत्र्य नव्हते त्यामुळे लेखन पण चोरून करायच्या. आणि अशा परिस्थितीत नाटक लिहिण्याचा व्यापमोठा असल्याने व त्याचे वेगळे तंत्र असल्याने कदाचित महिला नाट्य लेखनात मागे असाव्यात. कोकणीत मात्र बऱ्याच जणींनी नाट्यलेखन केले असल्याचे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले. अश्विनी जांबावलीकर म्हणाल्या, कुठलेही ध्येय साध्य कण्यासाठी मेहनत आणि जिद्द हवी. मी असाध्य रोगाशी सामना केला पण संगीत सोडले नाही. संगीतामुळे मला मानसिक समाधान लाभले . महिलांनी ठरवले तर त्यांना कुठलीच गोष्ट अशक्य नाही. यावेळी आग्रहास्तव त्यांनी स्वकुल तारक सुता हे नाट्यपद गाऊन उस्फूर्त दाद मिळवली. स्वागतपर भाषणात दशरथ परब म्हणाले, आज महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. आजची महिला सशक्त आहे आणि महिला सशक्त असतील तर देश सशक्त असेल. डॉ.लता नाईक यांनी सूत्रसंचालन केले. अशोक परब यांनी आभार मानले. डॉ. नूतन देव यांनी सांगितले, की आहार आणि चांगल्या सवयी आरोग्यासाठी महत्वाच्या असतात. विपरित परिणाम करणाऱ्या दूरदर्शन मालिका बघण्यापेक्षा महिलांनी प्रेरणादायी चरित्रे वाचावीत. चांगली पुस्तके वाचून मानसिकता घडते. मुलांना चांगली संस्कारक्षम पुस्तके वाचायला दिली पाहिजेत. तिसऱ्या सत्रात गट चर्चा झाली. त्यात राधा भावे (कविता), डॉ. प्रमदा देसाई (ललित लेखन), शकुंतला भरणे (संगीत व कविता) आणि दीपा मिरिंगकर (कथा लेखन) यांनी विचारमंथन केले.



**पणजी : बहुभाषिक महिला साहित्य मेळाव्याचे उद्‌घाटन करताना सुलक्षणा सावंत आश्विनी जांबावलीकर, डॉ.जयंती नाईक, दशरथ परब व अशोक परब.**

### लोक साहित्याचे संशोधन काळाची गरज : पौर्णिमा केरकर

**लोक परंपरा जगण्याचे सार सांगते. लोकसाहित्यातील प्रत्येक गीताला सामाजिक,सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. लोकसाहित्याचे संशोधन करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन लोकसाहित्याच्या अभ्यासक पौर्णिमा केरकर यांनी दुसऱ्या सत्रातील परिसंवादात केले. ज्योती कुंकळकर म्हणाल्या, महिला गृहिणी,नाती गोती, नोकरी आदी सांभाळून मग लेखन करतात. संघर्ष, तारेवरची कसरत करत असताना लेखनासाठी हवी असलेली शांतता त्यांना मिळणे कठीण होते. लेखनात सातत्य हवे. त्यासाठी वाचन महत्वाचे असते. महिलांकडे सृजनशील कला गुण असतात पण त्याचे चीज व्हायला हवे.**

## पान १ वरून

पान १ वरून

### मणिपूरमध्ये पुन्हा आंदोलन

२७ मार्च २०२३ रोजी मणिपूर उच्च न्यायालयाने राज्य सरकारला मैतेई समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याचा विचार करण्याचे निर्देश दिले होते. यानंतर ३ मे २०२३ रोजी मैतेई आणि कुकी समुदायांमध्ये जातीय हिंसाचार भडकला. या संघर्षात अनेकांचे बळी गेले असून, हजारो नागरिकांना आपली घरे सोडावी लागली आहेत. लष्कर आणि आसाम रायफल्सच्या जवानांची मदत घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली होती.

---

### बस्तोडा हल्ला प्रकरण : अद्याप आणखी अटक नाही

अटकेत असून मुख्य सूत्रधार आणि त्याचा मुलगा मोकाट आहेत, अशी तीव्र टीका करत डॉ. खलप म्हणाल्या, सरकारने या प्रकरणात विशेष तपास पथक स्थापन करावे आणि पीडित दाम्पत्याला न्याय मिळवून द्यावा.
त्या पुढे म्हणाल्या की, गर्भवती महिलेला शारीरिक आणि मानसिक त्रास झालेला आहे. जर बाळाला काही झाले, तर त्यास जबाबदार कोण? अशा प्रकारच्या हिंसाचाराला बळी पडणाऱ्या कोणत्याही महिलेसाठी ही घटना धक्कादायक ठरू शकते. डॉ. खलप यांनी गृहखात्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या मुख्यमंत्र्यांना थेट उद्देशून म्हटले की , आम्ही सरकारला स्पष्टपणे सांगतो की, पुढील पंधरा दिवसांत तपासात प्रगती झाली नाही आणि सर्व आरोपींना अटक झाली नाही, तर आम्ही आंदोलनात्मक भूमिका घेऊ.या पत्रकार परिषदेला उत्तर गोवा जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा मोली दा गामा सिल्वा, म्हापसा ब्लॉक महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा दीपा धुपडाळे आणि हळदोण ब्लॉक महिला काँग्रेसच्या अध्यक्षा बबिता नाईक उपस्थित होत्या.राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर आणि सरकारच्या संवेदनशीलतेवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# लोलये–पोळे येथे नूतनीकरण केलेल्या स्मशान भूमी पुनर्लोकार्पण

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ८ :** लोलये–पोळे, काणकोण येथे श्रध्दांजलीया नव्याने नूतनीकरण केलेल्या स्मशान भूमीचे पुनर्लोकार्पण गोवा विधानसभेचे माननीय अध्यक्ष आणि काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सरपंचा निशा च्यारी, पंच सदस्य अजय लोलयेंकर, पंकज बांदेकर, सचिन नाईक, चंद्रकांत सुधीर, राजेश नाईक, सुप्रिया पागी, रत्ना प्रभुदेसाई, माजी सरपंच मोहनदास लोलयेंकर, काणकोण भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा श्रीमती वृंदा सतरकर, माननीय सभापतींच्या ओएसडी आणि लोलये–पोळेचे ग्रामस्थ आदी उपस्थित होते.



लोलिम–पोळे पंचायतीने गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अनुकरणीय वचनबद्धता दर्शविली आहे. माननीय सभापती डॉ. रमेश तवडकर यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, पंच सदस्य श्री. अजय लोलयेंकर यांनी लोकांच्या कल्याणासाठी आणि गावाच्या प्रगतीसाठी अथक परिश्रम केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे या पवित्र स्मशानभूमीचे नूतनीकरण शक्य झाले, ज्यामुळे समुदायाला एक आदरणीय आणि प्रतिष्ठित स्थान मिळाले – ज्याचे नाव आता श्रद्धांजली आहे. असे सभापती रमेश तवडकर यानी यावेळी सांगितले.

# वेरे – वाघुर्मे ग्रामपंचायतीतर्फे जागतिक पर्यावरण दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ८ :** वेरे – वाघुर्मे ग्रामपंचायतीतर्फे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त पंचायत मंडळाने सावईवेरे गावातील एकूण पाच सरकारी प्राथमिक शाळांना भेटी देऊन सर्व शाळांत पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी सरपंचा शोभा पेरणी, उपसरपंच बाबू गावडे, पंच सदस्य नवनाथ वेलकासकर व लोचन नाईक यांनी सरकारी प्राथमिक विद्यालय सावईवेरे, स. प्रा. वि. कावंगाळ, स. प्रा. वि. वाघुर्मे , स. प्रा. वि. सावई व स. प्रा. वि. घाणो अशा गावातील पाच सरकारी शाळांना भेटी देऊन पाहणी केली व शिक्षकांकडून शाळांच्या समस्या जाणून घेतल्या.पंचायतीतर्फे त्या समस्या सोडविण्यात येतील, असे सरपंचा शोभा पेरणी यांनी आश्वासन दिले. प्रत्येक शाळेत वृक्षारोपण करून मुलांना पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद केले.याशिवाय मुलांना झाडांची रोपे दिली. व या रोपांची काळजी घेण्यास सांगितले. प्रत्येक शाळेतील शिक्षकांनी पंचायत मंडळाचे स्वागत केले.



**सावईवेरे : जागतिक पर्यावरण दिनी उपस्थित शोभा पेरणी, बाबू गावडे, नवनाथ वेलकासकर, लोचन नाईक, शिक्षक वर्ग व विद्यार्थी.**

# काणकोण सामाजिक आरोग्य केंद्रात रक्तदान शिबिर



**काणकोण : रक्तदान शिबीराचे उद्‌घाटन करताना ज्येष्ठ पत्रकार अजित पैंगीणकर व मान्यवर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ८ :** पैंगीण, काणकोण येथील ब्लड रिलेशन्स या गटातर्फे मानव संसाधन विकास महामंडळाच्या सहकार्याने काल दि.७ रोजी, काणकोण सामाजिक आरोग्य केंद्रात घेतलेल्या रक्तदान शिबीराला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद लाभला.यावेळी विविध क्षेत्रातील ८५ रक्तदात्यानी रक्तदान केले. काणकोण आरोग्य केंद्राचे कर्मचारी मनोज तारी यांनी शिबिरात ५० व्या वेळी सतत रक्तदान करून एक आदर्श घालून दिला.

काणकोण मानव संसाधन विकास महामंडळात काम करणाऱ्या महिला व पुरुष मोठ्या प्रमाणात या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन त्यांनी विक्रमी संख्येने रक्तदान करून नवीन आदर्श घालून दिला असल्याचे दामोदर च्यारी यांनी सांगितले.

या शिबिराच्या उद्‌घाटन सोहळ्याला प्रतापराव नाईक गावकर, नगरसेवक शुभम कोमरपंत, सामाजिक कार्यकर्ते दामोदर च्यारी, पैंगीणचे उपसरपंच सुनील पैंगीणकर, जेष्ठ पत्रकार अजित पैंगीणकर, सुरक्षा अधिकारी पांडुरंग च्यारी, गौरीक्ष वेळीप, सुनय कोमरपंत, अनुप पैंगीणकर, प्रवीण भट आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते पारंपरिक समई प्रज्वलित करून या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. अशाप्रकारचा उपक्रम सुरू ठेवल्याबद्दल ब्लड रिलेशन्स गटाचे कौतुक करतानाच रक्तदान शिबीरात सहभागी झालेल्या सर्वांचे अभिनंदन मान्यवर मंडळी आपल्या भाषणात केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.प्रणिता भट यांनी केले. सुनील पैंगीणकर यांनी आभार व्यक्त केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी आल्या दुर्गा केटरर्सचे अमोल प्रभुगावकर, बाबास ड्रीम किचनचे आलोक पैंगीणकर, प्रतीक देसाई, संजय देसाई यांनी विशेष परिश्रम घेतले.

काणकोण सामाजिक केंद्रात ब्रदर म्हणून काम करणारे प्रशांत देविदास, गौरीश वेळीप,यांचे प्रयत्न, डॉ. रवीन रेगो आणि अन्य तसेच ब्लड रिलेशन्सचे अनुप पैंगीणकर,प्रवीण भट यांच्या पुढाकाराने हे शिबीर मेगा शिबीर ठरले.

# गोव्यात ॲप–आधारित टॅक्सी सेवांसाठी जीसीसीआय महिला शाखा आग्रही

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८ :** गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (जीसीसीआय) च्या महिला शाखेने अध्यक्ष आशा आरोंदेकर यांच्या नेतृत्वाखाली ७ जून रोजी पणजी येथील जीसीसीआय परिसरात एका बैठकीचे आयोजन केले होते. गोवा राज्यामध्ये विश्वासार्ह, ॲप–आधारित टॅक्सी सेवांसाठी सामूहिक आणि वाढत्या मागणीला पाठबळ देण्याच्या निर्धाराने विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, व्यावसायिक, उद्योजिका अशा विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.या बैठकीला जीसीसीआय व्यवस्थापकीय समितीच्या सदस्या पल्लवी साळगांवकर आणि जीसीसीआयच्या संचालक पल्लवी आरोंदेकर यांच्यासह विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या नामांकित महिला उपस्थित होत्या. नियोजित आणि विश्वासार्ह प्रवासी सेवा पर्यायांचा अभाव यामुळे महिलांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा तर आणतातच, त्याचबरोबर महिलांच्या आर्थिक विकास आणि सामाजिक सहभागाला देखील मर्यादित करतो, असा स्पष्ट सूर या बैठकीमध्ये सहभागी महिलांनी व्यक्त केला.आशा आरोंदेकर म्हणाल्या, महिला म्हणून, आम्हाला दररोज वाहतुकीच्या विविध आव्हानांना तोंड द्यावे लागते. म्हणूनच आम्ही या महिलांना त्यांचे विचार आणि अनुभव सादर करण्यासाठी एकत्र आणले आहे. विद्यमान ॲप्स उपयुक्त असले तरी, राज्यातील वाढती लोकसंख्या तसेच पर्यटक संख्या पाहता आपल्याला खरोखरच एका व्यापक नेटवर्कची आवश्यकता आहे. असा प्लॅटफॉर्म काही मोठे ब्रँडच उभारू शकतात असे नाही, तर ते गोवा–आधारित ॲपसुद्धा असू शकते.



# निसर्गाचे संवर्धन प्रत्येकाची जबाबदारी

## आमदार प्रेमेंद्र शेट | गोवा राज्य वन खात्यातर्फे नार्वेत पर्यावरणदिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ८ :** आमच्या नशिबात आलेला निसर्ग व पर्यावरण याचे रक्षण व संवर्धन करून ते पिढ्यानपिढ्या शाबूत ठेवण्याची जबाबदारी ही आमच्यावर आहे. आपले निसर्गाशी नाते अधिक दृढ करण्यासाठी आपण शपथबध्द व्हायला हवे. दरवर्षी होणाऱ्या पर्यावरण दिनानिमित्त झाडे लावून पर्यावरणावरील प्रेम दाखवण्यापेक्षा आपल्या परिसरात झाडे लावून दररोज झाडांना पाणी घालत निसर्ग वाढवण्यासाठी प्रत्येकाने शपथबद्ध व्हायला हवे. आजूबाजूच्या परिसरात साचणारा कचरा याची साफसफाई करताना आपण स्वतः कचरा करणार नाही व निसर्गाला त्याची हानी होऊ देणार नाही असा संकल्प प्रत्येकाने करावा, असे आवाहन मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट यांनी नार्वे येथे केले.

गोवा राज्य वन खात्यातर्फे नार्वे गावात पर्यावरणदिन साजरा करण्यात आला. यावेळी आमदार प्रेमेंद्र शेट यांच्या हस्ते उपस्थित लोकांना रोपट्यांचे वाटप करण्यात आले. तसेच आमदारांच्या हस्ते वृक्षारोपणही करून हा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी वन खात्याचे केरी विभागीय अधिकारी सेबेस्टीव्ह रॉड्रीगीस, भाजप उत्तर गोवा अध्यक्ष दयानंद कारबोटकर, पंचसदस्य, वन खात्याचे कर्मचारी व इतरांची उपस्थिती होती. पर्यावरण हा प्रत्येकाच्या जीवनात संवेदनशील असून त्याची भूमिका ही मोठी व महत्त्वाची आहे. झाडापासून मिळणारा प्राणवायू टिकवून ठेवण्यासाठी व तो येणाऱ्या पिढीला मिळावा या उद्देशाने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हायला हवे. आपला पर्यावरण व निसर्ग हा कचऱ्याच्या विळख्यात सापडत आहे. त्यातून बाहेर येण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीपूर्वक कार्य करायला हवे. तेव्हाच खरा पर्यावरणदिन आमच्या हातून साजरा झाला याचे समाधान प्रत्येकाला वाटणार , असेही आमदार प्रेमेंद्र शेट पुढे म्हणाले.

यावेळी वन विभागीय अधिकारी सेबेस्टीव्ह रोड्रिगीस यांनी म्हटले की, आपल्या जीवनात निसर्गाला मोठे स्थान आहे. निसर्ग जर राहिला नाही तर भविष्यात आम्हाला प्राणवायूसाठी भटकावे लागणार. जगात विकास हा महत्त्वाचा आहे, त्यासाठी होणारी वृक्षतोड हे आपण थांबू शकत नाही. परंतु वृक्षतोडीनंतर मोठ्या प्रमाणात झाडे लावणे व ती जगवणे हे कार्य आपल्या येणाऱ्या पिढीच्या सुखमय भविष्यासाठी आम्हाला हाती घ्यावेच लागणार असे म्हटले.



**नार्वे : वृक्षारोपण करताना आमदार प्रेमेंद्र शेट. सोबत वनाधिकारी सेबेस्टीव्ह रॉड्रिगीस, दयानंद कारबोटकर व इतर.**

VILLAGE PANCHAYAT POINGUINIM CANACONA, GOA

**Tender Notice No.**

Ref.No. VPP/CAN/2025-26/ 416 Date : 05/06/2025
Ref.No. VPP/CAN/2025-26/ 417 Date : 05/06/2025
Ref.No. VPP/CAN/2025-26/ 418 Date : 05/06/2025
Ref.No. VPP/CAN/2025-26/ 419 Date : 05/06/2025

**(e-tendering mode only)**

**TENDER SCHEDULE: 1.** The last date of online submission of tender is **18/06/2025 upto 3:00 P.M.. 2.** The date and time of opening of online tender is on **20/06/2025 at 3:00 p.m.** in the office of the Village Panchayat Poinguinim – Canacona- Goa.

For all participation and other details visit on e-tendering website
**https://eprocure.goa.gov.in**

Seal Sd/- ( Savita Ramesh Tawadkar ) Sarpanch V.P. Poinguinim

# हरमल कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे किनारा स्वच्छता अभियान




**हरमल : पर्यावरण दिनीनिमित्त समुद्रकिनारा स्वच्छता अभियान राबवले, त्यात सहभागी विद्यार्थी व अध्यापक वर्ग.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ८ :** येथील हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ नर्सिंगने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हरमल समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियान पूर्ण केले.ह्यावेळी कॉलेजच्या प्राचार्य किरुबा पॉल यांनी मार्गदर्शन केले.

या अभियानांत कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी किनारी भागातील टाकाऊ कचरा ज्यात प्लास्टिक कचऱ्याची उचल करून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी अभियान राबवले. यावेळी विद्यार्थ्यांनी प्लास्टिकपासून मुक्ती देण्यासाठी कागदी पिशव्यांचे वाटप केले. व्यवसायिकांना पिशव्यांचे महत्त्व सांगितले. प्लास्टिकमुळे रोगराई तसेच भटकी गुरे प्लास्टिक खात असल्याने भयंकर दुष्परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्लास्टिकचा वापर करू नये व प्लास्टिक घेऊ नये, असे आवाहन ह्यावेळी विद्यार्थ्यांनी केले.

ह्या अभियानांत राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा रेमो मनोज तसेच वर्ग समन्वयक प्रणाली, रामेश्वरी व प्रा. सौरभ यांनी परिश्रम घेतले. या अभियानातून कॉलेजने सामाजिक जबाबदारी व पर्यावरणीय परिस्थितीशी जुळवून घेण्याचा संदेश दिला आहे. शेवटी प्रा मनोज यांनी आभार मानले. कॉलेजच्या उपक्रमाचे संस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.